# सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर कल्याण, जिल्हा ठाणे

## यांचे न्यायालयात.

**MHTH080002792026**

**दिवाणी किरकोळ अर्ज १३५/२०२६**

**रविंद्र काशिराम कांबळे व इतर**

**वि.**

**कोणीही नाही**

**निशाणी क्रमांक १ खालील आदेश**

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज सन १८२७ चा मुंबई विनियम ८ अन्वये वारस दाखला मिळण्याकरीता दाखल केला आहे.

०२. अर्जदारांचे थोडक्यात म्हणणे असे आहे की, अर्जदार यांचे आजोबा गंगाराम सदु कांबळे (महार) यांचे दि. ०९/११/१९६१ रोजी बारावे गाव, ता. कल्याण येथे निधन झाले आहे. गंगाराम सदु कांबळे (महार) यांना यापुढे सोयीकरीता 'मयत' असे संबोधण्यात येईल. मयत यांची पत्नी शांताबाई गंगाराम कांबळे यांचे दि. ०७/०३/१९६५ रोजी बारावे गाव, ता. कल्याण येथे निधन झाले आहे. मयत यांचा मुलगा म्हणजेच अर्जदार क्रं. १ चे वडील काशिराम गंगाराम कांबळे यांचे दि. ०५/०९/१९७९ रोजी निधन झाले आहे. मयत यांची सुन म्हणजेच अर्जदार क्रं. १ ची आई सरला काशिराम कांबळे यांचे दि. ११/०८/१९७६ रोजी निधन झाले आहे. मयत यांची मुलगी म्हणजेच अर्जदार क्र. २ व ३ यांची आई वनिता गंगाराम सदु कांबळे (लग्नानंतरचे नाव सुलोचना अर्जुन जाधव) हिचे दि. ०६/०१/२०१३ रोजी निधन झाले आहे. मयत यांच्या मृत्यूपश्चात अर्जदार हे त्यांचे एकमेव वारस आहेत व इतर कोणीही वारसदार नाहीत. शासकीय व निमशासकीय कामासाठी मयत यांच्या वारसदाखल्याची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी सदर अर्ज दाखल केला आहे.

(महार) यांबाबत काही कागदपत्र नाहीत.

०३. अर्जाच्या अनुषंगाने जाहीरनामा नि.क्र. ०६ प्रसिध्द करण्यात आला. जाहीर नोटीस काढण्यात आली. अर्जदार क्र. १ यांनी अर्जाच्या पुष्ठ्यर्थ त्यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र नि.क्र. ७ वर दाखल केले असून मयत व त्यांची पत्नी शांताबाई, मुलगा काशिराम, सुन सरला व मुलगी सुलोचना यांचे मृत्युदाखले तसेच अर्जदार यांचे

आधारकार्ड यांच्या प्रती नि.क्र. ३ सोबत दाखल केले आहे. दि. ०४/०५/२०२६ रोजीची ''बित्तंबातमी'' या मराठी वृत्तपत्रात प्रसिध्द केलेली जाहीर नोटीस दाखल केली आहे.

०४. जाहिर नोटीस व जाहिरनामा प्रसिध्द झाल्यानंतर आजतागायत कोणीही अर्जदारांनी दाखल केलेल्या पुराव्याचे न्यायालयात हजर राहून खंडन केलेले नाही. अर्जदार हे हिंदू उत्तराधिकार अधिनियम १९५६ नुसार ते मयत झालेल्या इसमाचे वारस होतात. सबब अर्जदार यांना मयत यांचे वारस असल्याचे घोषित करणे न्यायोचित होईल.

०५. सदर कामी मे. मुंबई उच्च न्यायालयाच्या, औरंगाबाद खंडपीठाने निर्णित केलेल्या **गणपती विनायक आचवल वि. शासन एम.एच.एल.जे. २०१४ (६)६८३** या न्यायनिर्णयांचा आधार घेणे योग्य राहील असे मला वाटते. प्रस्तुत न्यायनिर्णयाद्वारे मे. मुंबई उच्च न्यायालयाने असे निर्णित केले आहे की, वारसा दाखला हा कोणत्याही मिळकतीच्या व्यवस्थापनासाठी नसतो तर वारसा दाखला हा केवळ औपचारीक दृष्टीने व्यक्तीची मृताचे वारस म्हणून ओळखीसाठी दिला जातो. त्यामुळे उपलब्ध पुराव्यानुसार अर्जदार यांच्या नावे वारस प्रमाणपत्र मंजूर करण्यास कोणतीही बाधा येत नाही. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१) अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) अर्जदार यांच्या नावे ते मयत गंगाराम सदु कांबळे (महार) यांचे मान्यताप्राप्त वारस असल्याचे जाहीर करणारे औपचारीक वारस प्रमाणपत्र, सन १८२७ चा मुंबई विनियम ८ अन्वये परिशिष्ट 'ब' मध्ये दिलेल्या नमुन्याप्रमाणे योग्य ते न्यायालयीन शुल्क आकारून नियमानुसार निर्गमीत करण्यात यावे.

Digitally signed by AGE SANTOSH HARI
Date: 2026.07.30 16:32:25 +0530

दिनांक : ३०/०७/२०२६ ( संतोष ह. आगे )

कल्याण सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,कल्याण.